


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ७५ वा | मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# दत्तकला संस्थेचा वाद की मनोहर भोसले प्रकरणाची राजकीय किनार ?

## दुसऱ्याच्या खात्यावरील १ लाख ४२ हजारांच्या व्यवहारावरून झोळ कुटुंबाला लक्ष्य



## राणा सूर्यवंशी आणि पोलिसांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशीची मागणी

## जरांगे पाटलांच्या आंदोलनाला सहकार्य केल्याचा राग; आर्थिक व्यवहारांचे सत्य बँक नोंदी व तपासातील कागदपत्रांतूनच स्पष्ट...!

**इंदापूर (कटूसत्य वृत्त):** दत्तकला शिक्षण समूहाचा आणि रामदास झोळ व माया झोळ यांचा भोंदूगिरी करणारा हरामखोर मनोहर ऊर्फ मामा भोसले याच्याशी कोणताही संबंध नसल्याचा दावा झोळ कुटूंबियांच्या बाजूने करण्यात येत आहे. दुसरीकडे, मनोहर भोसले प्रकरणात भाजप नेते रामदास झोळ यांच्या संस्थेतील आर्थिक व्यवहारांबाबत पोलिसांनी तपास केल्याचे आणि त्यांच्यावर आरोप झाल्याचे वृत्त विविध माध्यमांनी प्रसिद्ध केले आहे. या परस्परविरोधी दाव्यांच्या पार्श्वभूमीवर आता १ लाख ४२ हजारांच्या कथित व्यवहाराचा मुद्दा पुढे आला असून, दत्ता कला शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापनावरील वादालाही या प्रकरणाची किनार असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

**भाजप नेते रामदास झोळ व त्यांच्या कुटुंबीयांचा भोंदू मनोहर भोसले यांच्याशी दुरान्वयानेही संबंध नाही..; तसेच झोळ व त्यांच्या संस्थेचा आणि भोंदू मनोहर मामाच्या कोणत्याच खात्यावर १ रुपयाचा सुद्धा व्यवहार झालेला दिसून येत नाही मग....?**



| अ.क्र | नाव | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | लक्ष्मीकांत लिगाडे ( हेड अकाउंट ) ॲक्सीस बँक खाते क्रमांक ४९५१ | १६/०३/२०२६ | ४१,०००/- रु |
| २ | राजेंद्र हुंबे ( सिस्टम एडमिनिस्ट्रेटर ) ॲक्सीस बँक खाते क ३३९९०१००००४५९ | १६/०३/२०२६ | ४८,०००/- अक्षरशी |
| ३ | योगेश दिलीप सातपुते ( कार्यालयीन अधीक्षक, फार्मसी विभाग ) ॲक्सीस बँक खाते क ९२१०१००००९१०६६ | १६/०३/२०२६ | ४१,०००/- रु |
| ४ | संतोष चोपडे ( कॅशियर ) | १६/०३/२०२६ | ४८,०००/- रु |

### १ लाख ४२ हजाराचा व्यवहार; कर्मचाऱ्यांची भूमिका ?

या प्रकरणात दत्तकला शिक्षण समूहाशी संबंधित असलेले लक्ष्मीकांत लिगाडे, योगेश सातपुते आणि संतोष चोपडे या तीन कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक वेगवेगळ्या बँक खात्यांतून एकूण १ लाख ४२ हजार रुपये मनोहर भोसलेचा कर्मचारी संचित काळे याच्या खात्यावर पाठविण्यात आल्याचे पोलिस तपासातील कागदपत्रांवरून दिसून येत आहे. मात्र ती रक्कम अहिल्यानगर येथे झालेल्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्यक्रमासाठी मनोहर भोसले याचा कामगार संचित काळे याच्या नावावर त्या तिघांनी वैयक्तिक पाठवल्याचे झोळ कुटुंबियांकडून सांगितले जात आहे.

या व्यवहाराचा आधार घेऊन झोळ कुटुंबीयांना लक्ष्य केले जात असल्याचा आरोप त्यांच्या बाजूने करण्यात आला आहे. मात्र, या व्यवहारातील प्रत्येक कर्मचाऱ्याने किती रक्कम दिली, पैसे कोणत्या तारखेला पाठवले, संचित काळे यांची नेमकी भूमिका काय होती आणि या पैशांचा वापर कोणत्या कारणासाठी झाला, याचा तपशील समोर येणे गरजेचे आहे. जर हा व्यवहार खरोखरच कार्यक्रमाच्या आयोजनासाठी करण्यात आला असेल, तर त्यासंबंधीचे बँक स्टेटमेंट, कार्यक्रमाचे निमंत्रण, आयोजकांच्या नोंदी आणि संबंधित व्यक्तींचे जबाब यांची तपासणी होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पोलिसांनी या व्यवहाराचा संबंध कथित आर्थिक गैरव्यवहाराशी जोडला असल्यास, त्या संबंधाला आधार देणारे पुरावेही सार्वजनिक चर्चेत स्पष्ट झाले पाहिजेत. १ लाख ४२ हजाराचा व्यवहार झाला आहे तर मग एवढ्यावरूनच काळ्या पैशाच्या व्यवहाराचा निष्कर्ष काढता येईल का ?

संस्थेचे माजी विश्वस्त राणा सूर्यवंशी हा एका पोलीस अधिकाऱ्याच्या सहकार्याने झोळ कुटुंबीयांना खोट्या गुन्ह्यांत अडकवून मानसिक आणि आर्थिक त्रास देत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. सुर्यवंशी हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा वापर करून संस्थेवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करत असल्याचाही दावा करण्यात आला आहे.

पोलिस तपासातील कागदपत्रांबाबत झोळ यांच्या बाजूचा दावा असा आहे की, भाजप नेते रामदास झोळ यांनी मनोहर भोसले याच्याकडून कोणत्याही प्रकारची रक्कम घेऊन त्याला काळा पैसा पांढरा करून दिल्याचे पोलिस तपासातील कागदपत्रांतून दिसून येत नसल्याचा दावा झोळ यांच्या बाजूने केला जात आहे. हा दावा तपासातील मूळ कागदपत्रे, बँक खात्यांचे उतारे, व्यवहारांच्या तारखा, आर्थिक नोंदी वरून त्यांनी केला आहे. मात्र पोलिसांकडून मनोहर भोसले आणि झोळ यांच्या संस्थेशी संबंधित आर्थिक संबंध असल्याचा दावा करण्यात येतो. त्यामुळे तपासातील कागदपत्रांत नेमके काय नमूद आहे आणि त्यातून कोणते निष्कर्ष निघतात, हा या प्रकरणातील महत्त्वाचा प्रश्न आहे. केवळ वृत्तपत्रांतील बातम्यांवरून कोणाला दोषी ठरवता येत नाही; परंतु तपासातील निष्कर्षांना नाकारण्यासाठीही मूळ कागदपत्रांची पडताळणी आवश्यक आहे.

### संस्थेवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न...!



दत्तकला शिक्षण संस्थेचे माजी विश्वस्त राणा सूर्यवंशी यांच्याकडून संस्थेवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप झोळ यांच्या बाजूने करण्यात आला आहे. या कथित प्रयत्नात एका पोलीस अधिकाऱ्याचे सहकार्य घेतले जात असल्याचे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा वापर केला जात असल्याचेही सांगण्यात येत आहे. याबाबतचे मोठ्या प्रमाणात कॉल्स रेकॉर्डिंग संस्थेमधील कर्मचारी व इतर लोकांकडे उपलब्ध असल्याचे ही सांगितले. योग्य वेळ येताच हे कॉल रेकॉर्डिंग व्हायरल करण्यात येतील किंवा संबंधित न्यायालयात दाखल करण्यात येतील असे ही सांगितले. शैक्षणिक संस्था ही विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि कर्मचाऱ्यांच्या उपजीविकेशी संबंधित असते. त्यामुळे अशा प्रवृत्तीच्या लोकांना कोणत्याही राजकीय पक्षाने, नेत्यांनी व अधिकाऱ्यांनी पाठीशी घालू नये असे मत शैक्षणिक तज्ज्ञांकडून व जाणकारांकडून व्यक्त केले जात आहे.

### मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला सहकार्य केल्याचा राग ?

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आंदोलनाला रामदास झोळ यांनी मोठ्या प्रमाणात सहकार्य केले होते. या सहकार्यामुळेच झोळ कुटुंबीयांना लक्ष्य केले जात असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात चालू आहे. स्वयंघोषित समाजसेवक म्हणून वावरणाऱ्या राणा सूर्यवंशी यांच्याकडून पोलिसांच्या कथित सहकार्याने खोटे गुन्हे दाखल करून मानसिक व आर्थिक त्रास दिला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

### पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्न; स्वतंत्र चौकशीची मागणी

या प्रकरणात पोलिसा ऐवजी सदर संस्थेची धर्मादाय आयुक्त, शिक्षण किंवा आयकर विभागांमार्फत चौकशी केल्यानंतर पोलिसांनी कारवाई करणे योग्य झाले असते मात्र पोलिसांनीच अगोदर कारवाई केल्याने पोलिसांवर संशय निर्माण होत असल्याचे मत काही कायदा तज्ज्ञांनी बोलून दाखविले. कारण दत्तकला शिक्षण संस्था ही नामांकित संस्था आहे. त्याचा परिणाम शिक्षण क्षेत्रावर खूप मोठ्या प्रमाणात होवू शकतो. अशा परिस्थितीत झोळ यांच्या बाजूने पोलिसांवर पक्षपातीपणाचे आरोप होत असतील, तर संबंधित तक्रारींची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचे बोलले जात आहे.

### कोणत्याही मराठ्यांवर अन्याय होत असेल तर मी गप्प बसणार नाही - जरांगे पाटील



**कोण राणा असू नाही तर फिना असू मला त्याच काही देणं घेणं नाही. जर माझ्या एका ही मराठ्यांवर असे खोटे गुन्हे दाखल करून न्यायालयाची झेजंट लावणार असतील तर मी सोडणार नाही. जर त्यात थोडे जरी दोषी आढळल्यास कारवाई झालीच पाहिजे. पण जर कोणाच्या सांगण्यावरून झोळ दांपत्यांवर खोटी कारवाई असेल तर त्या पोलीस अधिकाऱ्याला आणि सांगणाऱ्याला सुट्टी नाही असा ईशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.**

लीगाडे, हुंबे, चोपडे व सोनवणे यांना राणा यांच्या सांगण्यावरून झोळ दांपत्यांच्या विरोधात जबाब देण्यासाठी पोलीसांनी खूप मोठ्या प्रमाणात दबाव टाकला व आमिष दाखवून प्रवृत्त केले परंतु त्यांनी पोलिसांना पाहिजे असा जबाब दिला नाही म्हणून त्यांच्यावर गुन्हे दाखल केले असल्याचे ही सांगितले. या प्रकारामुळे इतरही कर्मचाऱ्यांवर दबाव वाढत असल्याचे ही काही कर्मचाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

### राणा सुर्यवंशी याच्यावर योग्य ती कारवाई झालीच पाहिजे

राणा सुर्यवंशी हा कोण आहे हे मला माहीत नाही आणि त्याचे नाव ही मी भाजपच्या कोणत्याही कार्यकर्त्यांकडून ऐकले नाही किंवा कोणत्याही भाजपच्या कार्यक्रमात पाहिले नाही. त्यामुळे तो जर असे भाजपचे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव वापरून काही काळे धंदे करत असेल आणि त्यामुळे जर भाजप व मुख्यमंत्र्यांची बदनामी होत असेल तर त्याच्यावर योग्य ती कारवाई झालीच पाहिजे.

**- एक माळशिरस तालुक्यातील मोठा नेता**

### आरोप नव्हे, पुरावे बोलले पाहिजेत!

दत्तकला शिक्षण संस्थेचा व्यवस्थापनविषयक वाद, मनोहर भोसले प्रकरणातील कथित आर्थिक व्यवहार, तीन कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक खात्यांतून झाल्याचा दावा असलेली १ लाख ४२ हजाराची रक्कम आणि पोलिसांच्या भूमिकेबाबत उपस्थित केलेले प्रश्न या सर्व बाबींची स्वतंत्रपणे तपासणी होणे गरजेचे आहे. भाजप नेते रामदास झोळ आणि माया झोळ यांची बाजू समोर येणे जितके आवश्यक आहे, तितकेच पोलिसांनी तपासात मांडलेले आरोप हे राणा सूर्यवंशी यांच्याच सांगण्यावरून मांडलेत का ? याची चौकशी होणेही महत्त्वाचे आहे. संबंधित कर्मचाऱ्यांचे जबाब, बँक व्यवहारांची नोंद, संस्थेच्या व्यवस्थापनाचे दस्तऐवज आणि अधिकृत तपास अहवाल यांतूनच या प्रकरणातील सत्य स्पष्ट होऊ शकते.

संस्थेच्या नियंत्रणासाठी कोणताही बेकायदेशीर प्रयत्न झाला असेल, तर त्याची चौकशी झाली पाहिजे; आर्थिक गैरव्यवहार झाला असल्यास त्याचे पुरावे समोर आले पाहिजेत; आणि कोणावर खोटे गुन्हे दाखल करून अन्याय झाला असल्यास त्यालाही न्याय मिळाला पाहिजे. आरोपांच्या राजकारणापेक्षा निष्पक्ष तपास, पारदर्शकता आणि कायद्याची समान अंमलबजावणी यांनाच या प्रकरणात प्राधान्य मिळणे आवश्यक आहे.

### समाजाचे नेते झोपलेत का ?

मराठा समाजासाठी आंदोलन करत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मदत केली म्हणून जर या झोळ कुटुंबियांना खोट्या गुन्ह्यात अडकवून मानसिक, भावनिक व आर्थिक त्रास देत असतील तर पुढे समाजासाठी लढणारे उभा रहाणारा नाहीत. मराठा समाजासह सामाजिक चळवळीत काम करणारे नेते त्यांच्या कार्यक्रमावेळी मदत मागायला येतात मग अशा वेळी काय झोपा काढतात काय असा प्रश्न दत्तकला शिक्षण संस्थेबद्दल आस्था असणाऱ्यांनी व शिक्षण प्रेमींनी विचारला आहे.

याबाबत राणा सूर्यवंशी, संबंधित पोलीस अधिकारी आणि पोलिस प्रशासनाची अधिकृत बाजू घेण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही.

# नवदुर्गा माता मंदिरात यंदा गंगाआरती दर्शन

## नवरात्रोत्सवात विविध धार्मिक व समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जोडभावी पेठ येथील जय भारत नवरात्र महोत्सव तरुण मंडळ संचलित नवदुर्गा माता मंदिर समितीच्या वतीने यंदाचा नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. मंडळाचे यंदाचे ८४ वे वर्ष असून नवरात्रोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाच्या उत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे वाराणसी येथील जगप्रसिद्ध गंगाआरती दर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.






जय भारत नवरात्र महोत्सव मंडळाची स्थापना सन १९४२ मध्ये करण्यात आली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या काळात मंडळाच्या माध्यमातून परिसरातील नागरिक व युवकांना एकत्रित करून धार्मिक व सामाजिक उपक्रमांना सुरुवात करण्यात आली. सन १९४२ पासून घटस्थापनेच्या दिवशी देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याची परंपरा आजतागायत कायम आहे.

कै. नीलकंठप्पा कलशेट्टी, चन्नप्पा पसारगे, इरप्पा उळागड्डे व कै. सिद्रामप्पा व्हंड्राव यांच्या पुढाकारातून नवरात्रोत्सवाची सुरुवात झाली. त्यानंतर कालांतराने मंडळाची धुरा कै सोमशेखर व्हंड्राव यांनी समर्थपणे सांभाळली. परिसरातील युवकांना एकत्रित करून नवरात्रोत्सव अधिक व्यापक स्वरूपात साजरा करण्याबरोबरच विविध सामाजिक उपक्रमांना त्यांनी चालना दिली.

देवीची मूर्ती प्रतिष्ठापित करण्यासाठी जागा अपुरी पडत असल्याने सन २००३ मध्ये नवदुर्गा माता मंदिराची स्थापना करून भव्य मंदिराची उभारणी करण्यात आली. मंदिर उभारणीमध्ये सिद्धेश्वर नाडार, संजय होमकर, भीमाशंकर पदमगोंडा, नारायण सुरवसे, शेखर सुरवसे, नागेंद्र धनोरे, नागेश व्हंड्राव, यशवंत चव्हाण, आप्पासाहेब पसारगे यांचे मोलाचे योगदान आहे. मंदिराच्या माध्यमातून धार्मिक कार्यक्रमांसोबतच वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत.

मंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, विद्यार्थ्यांना दत्तक घेणे, विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तकांचे वाटप, पाणपोई, गरजू नागरिकांना दिवाळी किटचे वाटप, फराळ वाटप यांसह विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून समाजसेवेचा संदेश देण्याची परंपरा मंडळाने गेल्या अनेक वर्षांपासून जपली आहे.

यंदाच्या नवरात्रोत्सवात रमेश धनुरे यांच्या अध्यक्षाखाली वाराणसी येथील जगप्रसिद्ध गंगाआरती दर्शनाचा विशेष धार्मिक उपक्रम आयोजित करण्यात आल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. नवरात्रोत्सवातील सर्व धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांमध्ये परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस आधारस्तंभ सिध्देश्वर नाडार, संजय होमकर, अध्यक्ष रमेश धनुरे, मार्गदर्शक जगदीश व्हंड्राव, प्रशांत धनुरे, उपाध्यक्ष नरेंद्र होमकर, खजिनदार चंद्रकांत सिंगराल, सचिव महेश बुध्दे, सागर अतनुरे आदी उपस्थित होते.

# अकलूज येथे सण उत्सवाच्या मुहूर्तावर अवैध मटका बुकिंगचा धुमाकुळ

## जुने बसस्थानक परिसर मटका बुकिंगने गजबजला!



**अकलूज (विलास गायकवाड):-** अत्यंत धडाकेबाज कामगिरी करत असलेले आणि जनतेकडून मिळत असलेला कौतुकाचा सन्मान, अशा अकलूज पोलिसांना चकवा देत, मटका बुकिंग खोरानी सण उत्सवाच्या काळात, जुने बसस्थानक परिसरात अवैध मटका बुकिंगचा धुमाकूळ घातला असून, अकलूज पोलिसांनी तात्काळ याकडे लक्ष केंद्रित करून, संबंधित लोकांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी होऊ लागली आहे.

एका बाजूला जुने बसस्थानक, दुसऱ्या बाजूला भाजी मंडई, तर दोन्हींच्या मधून राज्य मार्ग आहे. यामुळे जुने बसस्थानक परिसरात नागरिकांसह प्रवाशांची सतत वर्दळ असते. अशा महत्त्वाच्या ठिकाणी रस्त्या लगत, मटका बुकिंग खोराने तोडक्या मोडक्या टपऱ्या मांडून, मटका बुकिंग धंद्याला चालना देण्याचं काम सुरू आहे.

अकलूजचे जुने बसस्थानक हा नागरिकांच्या दैनंदिन वर्दळीचा परिसर आहे. बसस्थानकामुळे प्रवाशांची सतत ये-जा सुरू असते. लगतच्या राज्य मार्गावरून वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. भाजी मंडई खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांची दिवसभर गर्दी असते. अशा गजबजलेल्या ठिकाणी रस्त्या लगत मटका बुकिंग सुरू असल्याचे चित्र समोर येणे ही गंभीर बाब आहे.

अशा लोकांच्या मनामध्ये भय उरले नाही असे वाटते ? सार्वजनिक ठिकाणी रस्त्या लगत मटका बुकिंगमुळे अकलूज गावही बदनाम होण्यास वेळ लागणार नाही ?

कोणाच्या वरदहस्ताने मटका बुकिंग सार्वजनिक ठिकाणी घेतला जात आहे. गोरगरिबांच्या संसारात माती कालवणारा, मुख्य सूत्रधार कोण आहे ? हे शोधणे आता गरजेचे आहे. कारण ज्याच हातावरच पोट आहे असे मोलमजुरी करणाऱ्या लोकांचा कल, मटका खेळाकडे अधिक जाणवतो. कारण अशा अनधिकृत खेळातून दोन पैसे मिळतील या आशेने, ते मटका खेळतात परंतु काही तासाने त्यांच्या वाट्याला निराशा आलेली असते.म्हणून मटका बुकिंगचा बाजार मांडलेल्या लोकांवर, कठोर कारवाई होणे गरजेचे आहे, असे सर्वसामान्य जनतेला वाटते.




# लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी काँग्रेसचे तीव्र निदर्शने; मोदी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी, दिल्लीतील आंदोलनकर्त्या महिला व तरुणांवर झालेल्या मोदी सरकारच्या अत्याचारांच्या निषेधार्थ, तसेच मतचोरीच्या मुद्द्यावरून मोदी सरकारच्या विरोधात आणि सोलापुरात भाजपने केलेल्या आंदोलनाला काँग्रेसने 'स्टंटबाजी व नौटंकी' संबोधत केलेल्या निषेधार्थ खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हा परिषद पूनम गेट येथे तीव्र निदर्शने करण्यात आली. शहराध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या (पान 2 वर..)



## संपादकीय

# तोपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही!

केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आपल्याला रस्त्यावर उतरायचे आहे, त्यासाठी जंतर-मंतरवर जाण्याची गरज नाही हे आंदोलकांना समजलेले आहे. मोदी सरकारला हे आंदोलन आटोक्यात आणतेवेळी, 'आपल्याला शेतकऱ्यांसमोर झुकावे लागले होते' याची आठवण ठेवावी लागेल.

'नीट' प्रकरणामध्ये तत्कालीन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी कॉक्रोच जनता पार्टी (सीजेपी), डाव्या विद्यार्थी संघटना, दलित संघटना, कुठल्याच विचारांशी थेट बांधिलकी नसलेलेही तरुण-तरुणी अशा जेन-झी आंदोलकांनी दिल्लीत जंतर-मंतरवर ठिय्या दिला होता. तीन महिन्यांपूर्वी जंतर-मंतर हे आंदोलनाचे एक ठिकाण झाले होते. तिथे दररोज तरुण आंदोलक गर्दी करत होते, कल्पकतेने केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत होते, समाजमाध्यमांवर रील्स बनवत होते, नवनव्या टॅगलाइन्स तयार करत होते आणि हे सगळे व्हायरल होत होते.

'जंतर-मंतर १.०' आंदोलन धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यामुळे यशस्वी झाले. आंदोलनाच्या शेवटच्या दिवशी जंतर-मंतर ओसंडून वाहात होते. केंद्र सरकारविरोधात इतकी प्रचंड गर्दी बारा वर्षांत पहिल्यांदाच दिल्लीतच काय अख्ख्या देशात पहिल्यांदा दिसली होती. मग, सगळे पांगले, आंदोलनस्थळ ओस पडले. पण जंतर-मंतर हे केवळ आंदोलनस्थळ उरले नाही. ते मोदी सरकारविरोधातील आंदोलनाचे मोठे प्रतीक बनले. हे रूपांतर खरे तर तेव्हाच झालेले होते. त्याचे दृश्यस्वरूप शनिवारी दिल्लीत पाहायला मिळाले. दिल्लीभर जिकडे-तिकडे 'जंतर-मंतर' दिसू लागले.

जंतर-मंतर या आंदोलनस्थळाकडे जाणारे सर्व रस्ते शुक्रवारी संध्याकाळपासून रविवारपर्यंत बंद केलेले आहेत, तिथे भयाण शांतता आहे. या ठिकाणाच्या जवळपास जाता येते ते जनपथ लेनमधून. केरळ हाऊसच्या मागच्या गल्लीतून. याच गल्लीतून जंतर-मंतर १.० आंदोलनाच्या शेवटच्या दिवशी देशभरातून लोकांचा ओघ जाताना पाहिला होता. पण शनिवारी जंतर-मंतरच्या आसपासदेखील आंदोलकांना पोहोचता आले नाही. या स्थळापासून दोन-अडीच किमीच्या अंतरावरच आंदोलकांची पोलिसांनी धरपकड सुरू केली होती.

'ऑल इंडिया स्टुडण्ट्स असोसिएशन' (एआयएसए)च्या राष्ट्रीय अध्यक्ष नेहा बोरा आणि इतर डाव्या विद्यार्थी संघटनांचे कार्यकर्ते गेल्या आठवड्यात केरळ हाऊसपर्यंत म्हणजे जंतर-मंतर रोडवर तरी पोहोचले होते. यावेळी पोलिसांनी इतकी नाकाबंदी केली आहे की, तिथेपर्यंत कोणी पोहोचू शकले नाही. पोलिसांच्या म्हणा किंवा मोदी सरकारच्या या दमनशाहीतून जंतर-मंतर नावाचे प्रतीक लोकांच्या मनावर शनिवारी कोरले गेले असे म्हणता येईल.

आता आंदोलकांना मोदी सरकारविरोधात आवाज उठवण्यासाठी जंतर-मंतर या आंदोलनस्थळाची गरज उरलेली नाही. ते दिल्लीत कुठेही आंदोलन करू शकतात. एकत्र येऊ शकतात. घोषणाबाजी करू शकतात. त्यामुळे जंतर-मंतरभोवती पोलीस आणि निमलष्करी दलांची 'छावणी' उभी करण्यातून काहीच साध्य होत नाही हे केंद्र सरकारला कळले असेल. 'जंतर-मंतर १.०'च्या आंदोलनाची केंद्रीय गृहमंत्रालयाला इतकी भीती बसली असावी की, आंदोलकांनी पुन्हा ठिय्या दिला तर आपलेच पद तर जाणार नाही ना, असा प्रश्न काहींच्या मनात घर करून राहिला असू शकतो. निदान गेल्या वेळी एकाच ठिकाणी आंदोलक गोळा होत होते. आता दिल्लीभर आंदोलक कधी केव्हा रस्त्यावर उतरतील हे सांगता येत नाही. ते जिथे येतील, तिथे पोलिसांना धावावे लागेल. मग शेजारच्या राज्यांतून पोलिसांचा फौजफाटा आणून जंतर-मंतरवर तैनात करण्यातून काय साध्य होणार हा प्रश्न गृहमंत्रालयाला विचारता येऊ शकतो.

केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात आपल्याला रस्त्यावर उतरायचे आहे, त्यासाठी जंतर-मंतरवर जाण्याची गरज नाही हे आंदोलकांना समजलेले आहे. जिथे अडवले जाईल, तिथे आपले जंतर-मंतर असे मानून आंदोलक दररोज होत राहिले तर मोदी सरकारच्या नाकीनऊ येईल हे निश्चित. या सरकारने शनिवारी सुमारे सात हजार आंदोलकांना ताब्यात घेतले. त्यांच्यासाठी लाखभर सुरक्षा जवान तैनात केले. मेट्रो बंद केली, रेल्वेगाड्या रद्द केल्या. ल्युटन्स दिल्लीत अक्षरशः 'टाळेबंदी' लागू केलेली होती. आंदोलकांना अशा अडथळ्यांनी काहीही फरक पडलेला नाही. आणखी किती दिवस मेट्रो, रेल्वे, ओला-ऊबर बंद ठेवणार, इंटरनेटची सेवा दिवस-दिवस बंद ठेवता येऊ शकेल का, याचा खरेतर गृहमंत्रालयाने विचार करण्याची गरज आहे.

आता आंदोलक मागे हटणार नाहीत, ते ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेतल्याशिवाय शांत बसणार नाहीत, ही लढाई दीर्घकाळ लढावी लागेल हेही त्यांना माहीत आहे. त्यासाठी त्यांनी मानसिक तयारी केलेली आहे. ते दररोज रस्त्यावर उतरतील. त्यांना दररोज ताब्यात घ्यावे लागेल. या तरुणांना आंदोलन केले म्हणून अटक करता येणार नाही. शिवाय, किती जणांना अटक करणार? दररोज सात हजार जणांना अटक करणे सरकारला परवडणारे आहे का? या अटकेचा देशभर काय परिणाम होईल. आणि अटक करणार तरी कशी? मग ताब्यात घेण्यातून तरी काय साध्य होईल, त्यातून दररोज पोलीस आणि निमलष्करी जवानांची बदनामी होत राहील. शनिवारी दिल्लीभर पोलिसांनी कशी दडपशाही केली याच्या चित्रफिती पुरेशा व्हायरल झालेल्या आहेत. त्याची दखल देशातच नव्हे परदेशातही घेतली गेलेली आहे. जितकी पोलिसांची बदनामी होईल, तितके आंतरराष्ट्रीय स्तरावर मोदी सरकारही बदनाम होत राहील. आंदोलन दडपण्यासाठी पोलीस दररोज वापरले गेले तर हे जवान दररोज आंदोलकांची धरपकड करतील. 'जंतर-मंतर १.०' मध्ये पोलिसांनी पॅलेट गनचा वापर केला, लाठीमार केला, साध्या वेशातील पोलिसांनी महिला आंदोलकांना शारीरिक त्रास दिला. शनिवारी पोलिसांनी पॅलेट गनचा वापर केला नसेल; पण धरपकड कशी केली हे लोकांनी पाहिले आहे. 'जंतर-मंतर २.०' आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. मात्र, त्यातून मोदी सरकारची प्रतिमा अधिकाधिक डागाळत गेली हे कोणी नाकारू शकत नाही. या दडपशाहीतून सरकार भयग्रस्त झाले आहे का, असा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे.

कॅनॉट प्लेसवर शनिवारी काही हिंदुत्ववादी, भाजपसमर्थक टोळक्याने आंदोलकांना मारहाण करून हिंसा केली होती. अशी हिंसा करून केंद्र सरकार आंदोलकांना शांत करू शकेल असे दिसत नाही. मोदी सरकारबद्दलची लोकांच्या मनातील भीती संपलेली आहे, काही गुंड रस्त्यावर उतरवून लोकांना घाबरवता येईल अशी परिस्थिती राहिलेली नाही. शनिवारी आंदोलक आणि कथित गुंडांमधील संघर्षाची तीव्रता फार नव्हती. पण त्याची पुनरावृत्ती होत राहिली आणि त्यातून अनिष्ट गोष्टी घडल्या तर मोदी सरकार अधिक अडचणीत येईल. एका बाजूला सीजेपी, डाव्या वआंबेडकरी संघटना आंदोलनामध्ये उतरल्या आहेतच. काँग्रेसही जोमाने रस्त्यावर उतरलेला आहे.

जितकी आंदोलनाची व्याप्ती वाढेल, तितकी आपली लोकप्रियता घटेल हे सरकारला समजत असणारच. मग, मोदी सरकार ज्ञानेश कुमारांवर राजीनामा देण्यासाठी दबाव का आणत नाही, असे विचारले जात आहे. ज्ञानेश कुमार पायउतार होणे सरकारला धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याइतके सोपे जाणार नाही. एका बाजूला ज्ञानेश कुमार तर दुसरीकडे आंदोलन अशा कोंडीतून बाहेर पडण्याचा निर्धोक मार्ग सरकारला सापडलेला नाही. मोदी-शहा शांत आहेत, त्यांचे मंत्री मौन बाळगून आहेत. त्यांच्या सार्वजनिक कार्यक्रमांची संख्या घटली आहे. या कार्यक्रमांची फारशी नोंद होत नाही. त्यांना प्रतिसाद मिळत नाही. मोदी सरकार आणि भाजपला उत्तर प्रदेशमधील विधानसभा निवडणूक जिंकण्याची आशा आहे. पण त्यासाठी पाच महिन्यांचा कालावधी बाकी आहे. इथे तर पुढील पाच दिवस आंदोलकांना कसे सामोरे जायचे याची चिंता आहे. मग उत्तर प्रदेशची चर्चा आत्ता कशासाठी करायची? मोदी सरकारला आधी हे नवे 'जंतर-मंतर' आंदोलन आटोक्यात आणावे लागेल, त्यासाठी तडजोड करावी लागेल. आपल्याला शेतकर्‍यांसमोर झुकावे लागले होते याची आठवण ठेवावी लागेल. तीच माफीची कृती पुन्हा करावी लागेल नाही तर आंदोलन थांबवण्याची शक्यता नाही!

# घटस्थापना : मनाची, संस्कारांची, नात्यांची आणि मूल्यांची!

जुन्या-नव्या विचारांची सांगड घालत संस्कृतीचा जागर करूया!
घट बसवूया भक्तीचा, मनात दिवा संस्कारांचा,
ओलावा जपूया नात्यांचा, जागर करूया मूल्यांचा!
जुन्या विचारांना नवी दिशा, नव्या विचारांना संस्कारांची जोड,
माणुसकीच्या या मंदिरात, प्रेमाची राहू दे अखंड ओढ!

घटस्थापना म्हणजे केवळ मातीच्या घटात धान्य पेरणे आणि देवीची पूजा करणे नव्हे, तर आपल्या मनात सकारात्मक विचारांची, कुटुंबात संस्कारांची, नात्यांत विश्वासाची आणि जीवनात माणुसकीच्या मूल्यांची स्थापना करणे होय.

आजच्या आधुनिक युगात आपण विज्ञान, तंत्रज्ञान आणि प्रगतीचा स्वीकार केला आहे. मात्र, या प्रवासात आपल्या संस्कारांची, नात्यांची आणि परंपरांची जपणूक करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**१. मनाची घटस्थापना**

आज घरातील प्रत्येकाच्या हातात मोबाइल आहे; पण एकमेकांशी बोलण्यासाठी वेळ नाही. जगाशी संपर्क वाढला; पण घरातील माणसांशी संवाद कमी झाला.

एका घरात आजोबा नातवाची वाट पाहत बसायचे. नातू मात्र मोबाइलमध्ये व्यस्त असायचा. एक दिवस शाळेत त्याला आजोबांवर निबंध लिहायला सांगितला. त्याने लिहिले, 'माझे आजोबा माझ्यावर खूप प्रेम करतात आणि मला सुंदर गोष्टी सांगतात.'

घरी आल्यावर आजोबांनी विचारले, 'बाळा, आज मी तुला कोणती गोष्ट सांगितली?'

नातू निरुत्तर झाला. त्याला जाणवले की, नात्यांबद्दल लिहिणे सोपे आहे; पण ती नाती जगण्यासाठी वेळ द्यावा लागतो.

तात्पर्य : या नवरात्रात मनाची घटस्थापना करूया. मनातील राग, अहंकार आणि द्वेष दूर करून प्रेम, संवाद आणि सकारात्मक विचारांना स्थान देऊया.

मनामनांत प्रेम फुलो, विचारांत विश्वास राहो,
नात्यांच्या या सुंदर जगात, आनंदाचा सुगंध दरवळो!

**२. संस्कारांची घटस्थापना**

संस्कार म्हणजे केवळ मोठ्यांच्या पाया पडणे नव्हे, तर दुसऱ्याच्या दुःखात सहभागी होणे, गरजवंताला मदत करणे, प्रामाणिकपणे वागणे आणि प्रत्येकाचा आदर करणे होय.

एका मुलाला रस्त्यावर पैशांनी भरलेले पाकीट सापडले. त्याच्या वडिलांनी ते पाकीट मालकाला परत केले.

मुलाने विचारले, 'बाबा, आपण ते पैसे स्वतःकडे ठेवले असते तर?'

वडील म्हणाले, 'बाळा, दुसऱ्याचे पैसे आपल्याकडे ठेवले असते, तर खिशात पैसे वाढले असते; पण मनातील प्रामाणिकपणा कमी झाला असता!'

हा प्रसंग मुलाला आयुष्यभरासाठी संस्कार देऊन गेला.

मुलांना आपण काय शिकवतो, यापेक्षा आपण स्वतः कसे वागतो, याचा अधिक प्रभाव त्यांच्या मनावर पडतो.

संस्कारांची शिदोरी, आयुष्यभराची कमाई,
सत्य, प्रेम अन प्रामाणिकपणा, हीच जीवनाची खरी कमाई!

**३. नात्यांची घटस्थापना**

पूर्वी सणासुदीला कुटुंबातील सर्वजण एकत्र यायचे. आज डिजिटल शुभेच्छा भरपूर मिळतात; पण प्रत्यक्ष भेटण्यासाठी वेळ कमी पडतो.

आपण देवीसमोर दिवा लावतो; पण घरातील ज्येष्ठांच्या जीवनात आनंदाचा दिवा लावतो का? आपण देवीला फुले वाहतो; पण आपल्या माणसांना प्रेमाचे दोन शब्द देतो का?

या नवरात्रात नात्यांना वेळ देऊया.

आजी-आजोबांच्या गोष्टी ऐकूया, मुलांसोबत खेळूया, कुटुंबासोबत संवाद साधूया आणि गैरसमज दूर करण्यासाठी पुढाकार घेऊया.

कारण नाती महागड्या भेटवस्तूंनी नव्हे, तर प्रेम, विश्वास आणि सहवासाने टिकतात.

नात्यांना पैसा नको, प्रेमाचा आधार हवा,
दुरावलेल्या मनांना, संवादाचा पूल हवा!

**४. जुन्या-नव्या विचारांची सुंदर सांगड**

जुन्या पिढीकडे अनुभवांचे शहाणपण आहे, तर नव्या पिढीकडे विज्ञान आणि तंत्रज्ञानाची ताकद आहे. या दोन्हींचा संगम झाला, तरच समाजाची खरी प्रगती होईल.

पूर्वी आजी पंचतंत्राच्या गोष्टी सांगायची. आज मोबाइलवरही चांगल्या गोष्टी ऐकता येतात. मग आजीच्या गोष्टी आणि आधुनिक तंत्रज्ञान यांची सांगड का घालू नये?

पूर्वी सण पर्यावरणाशी नाते जोडणारे होते. आज आधुनिक सजावटीबरोबर पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरे करता येतात.

नवरात्रात आपण देवीशक्तीची पूजा करतो. त्याचबरोबर मुलींच्या शिक्षणाला, स्वातंत्र्याला आणि समानतेला महत्त्व देणेही आवश्यक आहे.

जुन्या परंपरांतील चांगुलपणा जपूया आणि नव्या विचारांतील विवेकाचा स्वीकार करूया!

जुन्याचा आदर, नव्याचा स्वीकार,
विवेकाने करू विचारांचा विस्तार!
संस्कारांची मुळे खोलवर रुजवूया,
प्रगतीच्या आकाशात मुक्तपणे झेप घेऊया!

**समारोप :**
**या घटस्थापनेचा संकल्प**

चला, या नवरात्रात आपण चार संकल्प करूया –

- मनासाठी — राग, द्वेष आणि अहंकार दूर करून सकारात्मक विचार जोपासूया.
- संस्कारांसाठी — सत्य, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि समतेचा स्वीकार करूया.
- नात्यांसाठी — संवाद वाढवूया, ज्येष्ठांचा सन्मान करूया आणि कुटुंबाला वेळ देऊया.
- मूल्यांसाठी — श्रद्धेला विवेकाची आणि भक्तीला माणुसकीच्या सेवेची जोड देऊया.

घटातील बीजाला पाणी मिळाले, तर अंकुर फुटतो. त्याचप्रमाणे मनाला चांगले विचार, नात्यांना प्रेम आणि जीवनाला संस्कार मिळाले, तर आनंदी कुटुंब आणि सुसंस्कृत समाज घडतो.

घट बसवूया भक्तीचा, मनात विचारांचा प्रकाश,
संस्कारांनी समृद्ध होवो, प्रत्येक घराचा श्वास!
जुन्या-नव्याची सांगड घालून, नात्यांचा सन्मान करूया,
मनाची, संस्कारांची, नात्यांची अन मूल्यांची घटस्थापना करूया!

आपणा सर्वांना मंगलमय घटस्थापना आणि नवरात्रोत्सवाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!



**श्रीम. डॉ. किरण हणमंत घाडगे,** (शिक्षिका)
जिल्हा परिषद
प्राथमिक शाळा वेळापूर

पान १ वरून

## लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी...

या आंदोलनात काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसर घोषणांनी दणाणून गेला.

यावेळी बोलताना शहर काँग्रेस अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे यांनी केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील भाजप सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी सुरू असलेल्या लढ्याला पाठिंबा देण्यासाठी, तसेच सोलापुरात भाजपने केलेल्या आंदोलनातील दुटप्पीपणाचा निषेध करण्यासाठी काँग्रेसच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले आहे.

देशात काँग्रेससहित विरोधी पक्षांचा आवाज दडपण्यासाठी पोलिसी बळाचा वापर केला जात असल्याचा आरोप करत नरोटे म्हणाले की, दिल्लीतील आंदोलन रोखण्यासाठी रेल्वे, मेट्रो, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद करणे, सीमा सील करणे, आणि दडफशाही करून, मारहाण करून आंदोलकांना ताब्यात घेणे, अशा घटनांमुळे देशात लोकशाही आहे की हुकूमशाही, देशात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आहे.

केंद्र सरकार राहुलजी गांधी आणि विरोधकांच्या आंदोलनाला घाबरले आहे का? मतचोरीवर आणि निवडणूक प्रक्रियेबाबत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांवर उत्तर देण्याऐवजी आंदोलकांवर कारवाई का केली जात आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीचे खासदार आणि विविध विरोधी पक्षांचे नेते लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी एकत्र आले आहेत. निवडणूक प्रक्रियेतील अनियमितता आणि मतचोरीच्या आरोपांबाबत देशभरात आवाज उठवला जात आहे. या आंदोलनाला मिळणारा प्रतिसाद पाहता भाजपची परतीची वाट सुरू झाले आहे असे नरोटे म्हणाले.

सोलापुरात भाजपने केलेल्या आंदोलनावर टीका करताना काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतनभाऊ नरोटे म्हणाले की, भाजपला महिलांच्या सन्मानाची एवढीच काळजी असेल, तर दिल्लीतील आंदोलनादरम्यान महिला व तरुण आंदोलकांवर झालेल्या मोदी सरकारच्या अत्याचारांविरोधात त्यांनी आवाज उठवावा. आंदोलनकर्त्या महिलांना मारहाण करणे, त्यांचे कपडे फाडणे तसेच केस धरून फरफटत नेऊन त्यांना ताब्यात घेणे, या घटना महिला सन्मानाच्या दाव्यांशी विसंगत नाहीत काय? एकीकडे महिला सन्मानाच्या घोषणा द्यायच्या आणि दुसरीकडे मोदी सरकारकडून होत असलेल्या महिलांच्या सन्मानाशी संबंधित गंभीर प्रकरणांवर मौन बाळगायचे, हा भाजपचा दुटप्पीपणा असल्याची टीका नरोटे यांनी केली.

भाजपचे महिला सक्षमीकरणाचे दावे केवळ भाषणे आणि घोषणांपुरते मर्यादित आहेत का, असा सवाल उपस्थित करत त्यांनी महिला सन्मानाच्या नावाखाली राजकीय दिखावा करण्याऐवजी महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी ठोस भूमिका घेण्याचे आवाहन केले. महिला खेळाडूंच्या लैंगिक छळाच्या आरोपांवरून देशभरात आंदोलन झाले होते. तसेच माजी खासदार प्रज्वल रेवण्णा, ब्रिजेशकुमार यांच्यावर महिलांवरील लैंगिक अत्याचारांचे गंभीर आरोप झाले होते. या प्रकरणांसह महिलांच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रश्नांवर भाजपने आत्मपरीक्षण करावे, असेही नरोटे म्हणाले.

महिला सन्मानाच्या नावाखाली राजकीय स्टंटबाजी करण्याऐवजी दिल्लीतील आंदोलक महिलांवरील अत्याचारांविरोधात भाजपने भूमिका स्पष्ट करावी. महिलांच्या हक्कांचे आणि सन्मानाचे राजकारण करण्यापेक्षा त्यांच्या न्यायासाठी ठामपणे उभे राहणे महत्त्वाचे आहे. सोलापुरात भाजपने केलेले आंदोलन म्हणजे केवळ राजकीय स्टंटबाजी आणि नौटंकी आहे, अशी घणाघाती टीका चेतनभाऊ नरोटे यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, संविधानाने प्रत्येक नागरिकाला शांततापूर्ण आंदोलन करण्याचा अधिकार दिला आहे. मात्र, सोलापूर शहरात काँग्रेस कार्यकर्त्यांना आंदोलन करू नये म्हणून पोलिसांकडून नोटिसा बजावल्या जात आहेत. नोटिसा, धमक्या किंवा दडपशाहीच्या माध्यमातून जनतेचा आवाज बंद करता येणार नाही. सरकारच्या चुकीच्या धोरणांविरोधात आवाज उठवणे हा आमचा घटनात्मक अधिकार आहे. कितीही दडपशाही केली, तरी आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन सुरूच ठेवणार आहोत.

वोट चोरी बंद करा, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घ्या आणि एसआयआर प्रक्रिया रद्द करा, या आमच्या प्रमुख मागण्या आहेत. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची उत्तरे सरकारने द्यावीत. लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी काँग्रेसचा लढा सुरूच राहील, असा निर्धार चेतनभाऊ नरोटे यांनी व्यक्त केला.

यावेळी माजी महापौर सुशीलाताई आबुटे, प्रदेश सचिव श्रीशैल रणदिरे, कार्याध्यक्ष हणमंतु सायबोळु, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळे, मीडिया सेल अध्यक्ष तिरुपती परकीपंडला, भटक्या-विमुक्त विभागाचे अध्यक्ष युवराज जाधव, मागासवर्गीय विभागाचे अध्यक्ष सागर उबाळे, रोजगार-बेरोजगार विभागाचे अध्यक्ष रुपेश गायकवाड, यंग ब्रिगेड अध्यक्ष विवेक खन्ना, असंघटित कामगार सेल अध्यक्ष सुभाष वाघमारे, विचार विभागाच्या अध्यक्ष ॲड. करीमुन्निसा बागवान, ब्लॉक अध्यक्ष देवीदास गायकवाड, शिवशंकर आंजनाळकर, परशुराम सतारेवाले, एन. के. मुल्ला, उपाध्यक्ष अंबादास गुत्तीकोंडा, बसवराज म्हेत्रे, अनिल मस्के, सरचिटणीस ॲड. केशव इंगळे, गिरीधर थोरात, गणेश आप्पा नरोटे, शाफी हुंडेकरी, सागर शहा, रमेश फुले, संजय गायकवाड, विवेक इंगळे, भीमराव शिंदे, मोहसीन फुलारी, माजी नगरसेवक प्रा. भोजराज पवार, भारती ईपलपल्ली, माजी महिला अध्यक्ष सुमन जाधव, हेमाताई चिंचोळकर, शोभा बोबे, शुभांगी लिंगराज, मुमताज तांबोळी, ज्योती गायकवाड, संघमित्रा चौधरी, रेखा बिनेकर, अनिता भालेराव, मीना गायकवाड, ऐजाज बागवान, दशरथ सामल, व्यंकटेश बोमेन, काशिनाथ शिरशीकर, शिवाजी साळुंखे, हणमंतु रुपनर, रफिक रामपुरे, पवन सग्गम, विनायक भोसले, चंद्रकांत टिक्के, सुनील डोळसे, मलिक नदाफ, सर शुकुर शेख, अभिलाष अच्युगटला, पंडित बुवा गणेशकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहराच्या विकासात पत्रकारांची भूमिका मोलाची- महापौर कोंड्याल

## श्रमिक पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा महापालिकेत सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** लोकशाहीमध्ये पत्रकारितेचे स्थान महत्त्वाचे असून पत्रकार समाजातील विविध प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम करतात. शहराच्या विकासातही पत्रकारांची भूमिका मोलाची आहे. त्यामुळे पत्रकारांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी महापालिका सकारात्मक दृष्टिकोन ठेवेल. पत्रकारांच्या गृह प्रकल्पासाठी सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.



सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते सोमवारी महापौर कार्यालयात करण्यात आला.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर आणि नगरसेवक मनीष केत आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी चौदाव्यांदा निवड झाल्याबद्दल विक्रम खेलबुडे, सरचिटणीस आफताब शेख, खजिनदार विजय गायकवाड, उपाध्यक्ष अविनाश गायकवाड, नितीन पात्रे,

चिटणीस रतन (आप्पा) बनसोडे, प्रीतम पंडित, सहचिटणीस रोहित थळवे, कार्यकारिणी सदस्य रवी ढोबळे, श्रीनिवास मावनूर, गौतम गायकवाड, विक्रांत कालेकर, सचिन जाधव, यशवंत गुरव, नितीन कटके, मुजम्मील शाहनूरकर, सागर इप्पलपल्ली, महेश कुलकर्णी. सल्लागार प्रशांत जोशी आदींसह पदाधिकारी व कार्यकारणी सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पत्रकारांनी सोलापूर शहर विकासासाठी सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे.

पत्रकारांच्या गृहप्रकल्प सोयी सुविधायुक्त व्हावा यासाठी नेहमी सहकार्याची भूमिका राहील, असे आश्वासन देत नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक व सूत्रसंचालन पत्रकार किरण बनसोडे यांनी केले. जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार यांनी आभार मानले.

# ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाच्या शक्तिदेवीच्या प्राणप्रतिष्ठापना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त शक्तिदेवीच्या प्राणप्रतिष्ठापनेची भव्य मिरवणूक रविवारी रेल्वे स्थानक परिसरातील गांधी पुतळ्याजवळील पोस्ट ऑफिस येथून मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात काढण्यात आली. सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे आणि अक्कलकोट नगर परिषदेचे नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते शक्तिदेवीची महापूजा व आरती करून मिरवणुकीचा शुभारंभ करण्यात आला. 'आई राजा उदे उदे, सदानंदीचा उदे उदे' या जयघोषाने अवघा परिसर दुमदुमून गेला. सुमारे एक हजार लेझीमधारकांचा शिस्तबद्ध ताफा मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरला. पारंपरिक वेशभूषेतील युवकांनी अस्सल सोलापुरी ढोल-ताशा आणि संबळच्या निनादात लेझीमचे बहारदार डाव सादर केले. तालबद्ध संचलन, आकर्षक प्रात्यक्षिके आणि युवकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे मिरवणुकीत भक्ती आणि पारंपरिक कलेचा अनोखा संगम पाहायला मिळाला. आमदार देवेंद्र कोठे, माजी आमदार दिलीप माने, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्यासह उपस्थित मान्यवरांनीही लेझीम खेळात सहभाग घेतला. मिरवणुकीसाठी तयार करण्यात आलेला कंटेनर हे श्री क्षेत्र आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर कडे प्रस्थान होत असताना ज्या पद्धतीने सजावट करतात त्याचीच प्रतिकृती असलेले विविध रंगांच्या आकर्षक फुलांनी सुंदररीत्या सजविण्यात आला होता. या सजविलेल्या वाहनाच्या मध्यभागी शक्तिदेवीची मूर्ती, श्रीक्षेत्र सौंदत्ती येथील यल्लमादेवीची मूर्ती, शिवलिंगावरील शंकरांची मूर्ती तसेच भगवान विष्णू मूर्ती ठेवण्यात आली होती. मिरवणुकीच्या वाहनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मंडळाचे आधारस्तंभ तथा संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण (मामा) जाधव यांच्या नेतृत्वाखाली माजी नगरसेवक नागेश (अण्णा) गायकवाड, भाजपा नगरसेवक किसन (भाऊ) जाधव मार्गदर्शक ॲड. अनिल (दादा) जाधव, आणि उत्सव अध्यक्ष अंबादास पट्टप्पा जाधव (A24)



यांच्या मार्गदर्शनाखाली मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, नगरसेवक राजशेखर पाटील, स्वीकृत नगरसेवक अक्षय अंजीखाने, ज्ञानेश्वर माऊली म्याकल, नगरसेविका अश्विनी चव्हाण, चैत्राली गायकवाड, श्रद्धा किरण पवार, विधी समिती सभापती सत्यजित वाघमोडे, शिवस्मारक मंडळाचे अध्यक्ष रंगनाथ बंकापुरे, सदर बाजार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे, अश्विनी हॉस्पिटलचे सर्जन डॉ.सुजित जागीरदार, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, सुधीर बहिरवडे, पर्यावरण प्रेमी महेश देवकर, किरण पवार, मंडळाचे सल्लागार शिवाजी मामा गायकवाड, अंबादास गायकवाड, राजू गवळी, मामा गायकवाड, उत्पादन शुल्कचे सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक गैबू जाधव, गोपाळ बार्शीकर, मारुती अकलूजकर, मंडळाचे माजी अध्यक्ष सचिन अक्षय जाधव, टकारी युवक अध्यक्ष विनोद जाधव, पवन गायकवाड, अँड संजय राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. चेतन गायकवाड व कार्तिक जाधव यांनी मान्यवरांचे स्वागत व सन्मान केले. आमदार देवेंद्र कोठे यांनी मंडळाला नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा देत ईच्छा भगवंताची परिवाराच्या सामाजिक व सांस्कृतिक कायार्चे कौतुक केले.

गेल्या तीस वर्षांपासून मंडळाशी आपले जिव्हाळ्याचे संबंध असून, मंडळाचे कार्य जवळून पाहत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. पारंपरिक खेळांच्या माध्यमातून युवकांनी व्यसनांपासून दूर राहावे, भारतीय संस्कृतीचे जतन करावे आणि सामाजिक ऐक्याची भावना वृद्धिंगत करावी, असा संदेश या भव्य मिरवणुकीतून देण्यात आला. या मिरवणुकी दरम्यान पोलीस उपायुक्त प्रीतम यावलकर, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, शकलेस चाकोते, सलगर वस्ती पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा यांनी देखील सहभाग घेतला होता. मोठ्या भक्तीमय व मंगलमय वातावरणात आई राजा उदे उदे सदानंदीच्या उदो उदो गजरात रात्री शक्ती देवीची प्राणप्रतिष्ठापना विधिवत पूजनाने रामवाडी सेटलमेंट येथे करण्यात आले.

## वात्रटिका

### धास्ती लागली

अस्थिरतेच्या झोक्यावर
हेही बसले, तेही बसले...
कोणी चिकटून बसले तर
कोणी सक्तीने रजेवर गेले...
एक एक करून युवक
आता लक्ष टिपत आहेत...
खुर्चीवरल्यांना धास्ती की
दिवस संपत आले वाटत आहेत...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# दिल्लीतील कारवाईचे सोलापुरात तीव्र पडसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, खासदार प्रियंका गांधी आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्यासह अन्य खासदारांवर झालेल्या कथित लाठीचार्ज, धक्काबुक्की आणि अटकेच्या कारवाईचे पडसाद सोलापुरात उमटले. या कारवाईच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने काळा दिन पाळण्यात आला. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन दिल्लीतील कारवाईचा निषेध करण्यात आला.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर-मंतर येथे निदर्शने करण्यात आली होती. या आंदोलनादरम्यान राहुल गांधी, प्रियंका गांधी, प्रणिती शिंदे यांच्यासह सुमारे ३०० खासदारांवर पोलिसांनी लाठीचार्ज, धक्काबुक्की करून अटक केल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केला. या कारवाईमुळे लोकशाही मूल्यांना बाधा पोहोचत असल्याची भूमिका त्यांनी मांडली.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, भीमाशंकर जमादार, सुलेमान तांबोळी,

## महाविकास आघाडीकडून काळा दिन

भारत जाधव, प्रशांत साळे, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, प्रा. सिद्राम सलवदे, सुदर्शन आवताडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख, दत्ता घोडके, तुषार साठे, प्रशांत गायकवाड, मौलाली शेख, दत्तात्रय पवार, तुकाराम भडकुंबे, युवराज कापसे आदी उपस्थित होते.

**आवाज दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप**

लोकसभेतील विरोधी पक्षनेत्याचे पद महत्त्वाचे असून, अशा प्रमुख नेत्यांसह महिला खासदारांना धक्काबुक्की करून फरपटत नेणे ही लोकशाहीची पायमल्ली असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केला. या कारवाईचा निषेध म्हणून काळा दिन पाळण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या प्रकरणी राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष वसंत देशमुख यांनी स्पष्ट केले.

**राजीनाम्याशिवाय माघार नाही**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कथित गैरकारभाराबाबतची माहिती जनतेसमोर आली असून, त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी लढा सुरूच राहील, अशी भूमिका काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी मांडली. जोपर्यंत ज्ञानेश कुमार पदाचा राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

# पाककला स्पर्धेतून पोषण आहाराबाबत जनजागृती



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय पोषण महिन्यानिमित्त आरोग्य सुधारणा व निरोगी आहाराविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते..

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजयकुमार सरडे.वैद्यकीय अधिकारी डॉ. महेश सुडके यांच्या अध्यक्षतेखाली पाककला स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती.

सध्या सर्वत्र जीवनसत्त्व अ, जीवनसत्त्व ब 12 व कॅल्शियम या घटकांची कमतरता मोठ्या प्रमाणात दिसून येत असल्याने पोषणाबाबत जागरूकता वाढवणे या उपक्रमाचा उद्देश असून, सदर स्पर्धेत जीवनसत्त्व अ, जीवनसत्त्व ब 12, कॅल्शियम युक्त पदार्थ असा विषय देण्यात आला होता. सहभागी स्पर्धकांनी नाविण्यापूर्ण विविध पदार्थ बनवून आणले होते.

सदा स्पर्धेत प्रथम क्रमांक श्रीम. जयश्री जगताप. द्वितीय क्रमांक श्रीम. शितल रावळे, तृतीय क्रमांक श्रीम. कोमल एतवाडे तसेच उत्तेजनार्थ श्रीम. आरती बनकर यांनी नंबर पटकावला. ब्रदर गजानन कपाटे यांचा स्पर्धेत सहभाग घेतल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

स्पर्धेमधे डॉ ऋचा वैद्य मॅडम यांनी परीक्षण केले. स्पर्धेचे आयोजन सहायक अधिसेविका श्रीम. सिंधुताई लवाटे, आहारतज्ञ अनुराधा वाघमारे व आहारतज्ञ अमृता भातलवंडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम. मंगल करचे यांनी केले. तसेच राठोड यांनी कार्यक्रमासाठी मोलाची मदत केली .

# शिक्षकाला धमकावणाऱ्या धनसिंग राठोड यांच्यावर कारवाई करा अन्यथा आंदोलन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहर मध्य विधानसभा मतदारसंघात इछड म्हणून राष्ट्रीय कर्तव्य बजावणाऱ्या शिक्षकाला धमकी दिलेल्या धनसिंग राठोड यांच्यावर कारवाई करा अन्यथा आंदोलन करण्यात येईल. अशा आशयाचे निवेदन नायब तहसीलदार स्मिता गायकवाड यांच्याकडे दिल्याची माहिती पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षण परिषदेचे महासचिव सुनील चव्हाण यांनी दिली.

डॉ पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद, महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना, शिवछत्रपती शिक्षक संघटना, युवक शिक्षक कर्मचारी संघटना व अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटनेच्या संयुक्त कृती समितीच्या वतीने हे निवेदन देण्यात आले.

बीएलओ ड्युटीवर कार्यरत असणाऱ्या शिक्षकाला उत्तर सोलापूर तहसील कार्यालयातील सेवक धनसिंग राठोड यांनी फोनवरून अत्यंत अरेरावीची, उद्धट आणि अपमानस्पद भाषा वापरून धमकी दिल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली असून, संबंधित सेवकावर तातडीने कडक कायदेशीर आणि प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी केली आहे. कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही शिक्षकांनी दिला आहे.

**काय आहे नेमके प्रकरण ?**

शिक्षकांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनानुसार, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्तर सोलापूर तहसील कार्यालयातील सेवक धनसिंग राठोड यांनी राष्ट्रीय कर्तव्य बजावत असलेल्या शिक्षकाला फोन केला. या संभाषणादरम्यान राठोड यांनी संबंधित शिक्षकाला "तुझा करेक्ट कार्यक्रम करतो", "तुला पाहून घेतो", "तुला काय फाशी देणार आहेत का?" अशा अत्यंत अशोभनीय, एकेरी आणि असभ्य भाषेचा वापर करत धमकी दिली. प्रामाणिकपणे राष्ट्रीय कर्तव्य बजावणाऱ्या शिक्षकाचा अशा प्रकारे अपमान केल्यामुळे शिक्षक वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

या वेळी आप्पाराव इटेकर, विनोद आगलावे, मुरलीधर कडलासकर, संतोष माशाळे, सचिन चौधरी, अ. गफूर अरब, कोंडीबा जगदाळे, माजिद कलादगी, अन्वर शेख, सोहेल नाईक आदी उपस्थित होते.

**कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा:**

शिक्षकांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आणि शिक्षकांना धमकावणाऱ्या सेवक धनसिंग राठोड यांच्यावर तात्काळ कडक कायदेशीर कारवाई करून न्याय मिळवून द्यावा. जर या प्रकरणी योग्य ती कारवाई झाली नाही, तर सर्व शिक्षक संघटनांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# उत्पादनवाढीसाठी शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा : रणजितसिंह शिंदे



**मानेगाव (कटूसत्य वृत्त) :** शेती व्यवसाय अधिक किफायतशीर करण्यासाठी शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करावा, असे आवाहन जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी केले. सध्या शेतीसाठी कुशल मजुरांची कमतरता जाणवत आहे. पारंपरिक पद्धतीने शेती करताना वेळ अधिक लागतो आणि अपेक्षित उत्पादन मिळण्यातही अडचणी येतात. त्यामुळे ट्रॅक्टर, हार्वेस्टिंग मशीन, ड्रोनद्वारे फवारणी, स्प्रिंकलर आणि ठिबक सिंचन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास वेळ, पाणी व मजुरीची बचत होऊन उत्पादनवाढीस मदत होते, असे त्यांनी सांगितले.

पिंपळनेर (ता. माढा) येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना परिसरात ड्रोनची पाहणी व प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. या वेळी ते बोलत होते.

रणजितसिंह शिंदे म्हणाले की, आधुनिक शेतीमध्ये ड्रोनद्वारे फवारणी करणे ही काळाची गरज बनली आहे. शेतातील पिकांचे योग्य वेळी निरीक्षण करून आवश्यक उपाययोजना करणे महत्त्वाचे आहे. यासाठी दोन्ही साखर कारखान्यांच्या माध्यमातून उपग्रह तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऊस पिकाचे निरीक्षण करण्याचे काम सुरू आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना कमी दरात वेळेवर पीकविषयक सल्ला आणि आवश्यक सुविधा उपलब्ध होत आहेत. भविष्यात याचा ऊस उत्पादनवाढीसाठी फायदा होईल. तसेच पिकांवरील कीड व रोगांचे नियंत्रण करण्यासाठीही हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरणार आहे.

**३,६०० एकर क्षेत्रावर ड्रोनद्वारे फवारणी**

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक-चेअरमन व माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे १,५०० एकर क्षेत्रावर, तर बबनरावजी शिंदे शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे संस्थापक-चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे २,१०० एकर क्षेत्रावर ड्रोनद्वारे सवलतीच्या दरात फवारणी करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे अनेक गरीब व गरजू शेतकऱ्यांच्या खर्चात लाखो रुपयांची बचत झाल्याचे सांगण्यात आले. तसेच ऊस पिकाचे संगोपन व संवर्धन अधिक चांगल्या प्रकारे होण्यास मदत झाली आहे.

यावेळी महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीचे हब मॅनेजर अजिंक्य जाधव, प्रिसिजन फार्मिंग विभागाचे योगीराज रणनवरे, अथर्व पाटील आणि युवा उद्योजक निखिल खेतमाळ उपस्थित होते.

# उजनीतील प्रकल्पांना महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचा विरोध; करमाळ्यात कार्यकर्ता मेळावा



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील गोरगरीब आणि सर्वसामान्य जनतेच्या न्याय-हक्कांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्यास महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष सज्ज असल्याचे प्रतिपादन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजय सोनवणे यांनी केले. उजनी परिसरातील प्रस्तावित एआय (AI) डेटा सेंटरसह एकूण तीन प्रकल्पांना पक्षाचा तीव्र विरोध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

करमाळा येथे आयोजित पक्षाच्या कार्यकर्ता मेळावा व नूतन कार्यकारिणी निवड बैठकीत ते बोलत होते. यावेळी पक्षाच्या पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्षपदी यशपाल कांबळे यांची निवड करण्यात आली. नूतन कार्यकारिणीची सवार्नुमते निवड करून पदाधिकाऱ्यांना निवडीची पत्रे देण्यात आली. यावेळी संजय सोनवणे यांनी यशपाल कांबळे यांच्या कायार्चे कौतुक केले. कांबळे हे कणखर आणि संघर्षशील युवा नेतृत्व असून, सर्वसामान्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात, असे त्यांनी सांगितले. फार्मर आयडीच्या प्रश्नावरही कांबळे यांनी आंदोलनाचा इशारा देत शेतकऱ्यांच्या समस्यांकडे लक्ष वेधल्याचे त्यांनी नमूद केले. स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, जनतेच्या प्रश्नांवर आवाज उठवणे आणि युवकांना संघटित करून जनआंदोलने अधिक प्रभावी करणे, यासाठी पक्ष प्रयत्नशील राहील, असा विश्वास सोनवणे यांनी व्यक्त केला.

या मेळाव्यास पक्षाचे पदाधिकारी, नवनिर्वाचित कार्यकारिणी सदस्य, कार्यकर्ते आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दक्षिण तालुक्यात वीज पडून मृत्युमुखी पडलेल्या जनावरांच्या मालकांना शासकीय मदत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** तीन महिन्यांपूर्वी दक्षिण सोलापूर तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसादरम्यान दुर्दैवाने वीज पडून काही शेतकऱ्यांच्या जनावरांचा मृत्यू झाला होता. या नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत सापडलेल्या बाधित शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाच्या वतीने नुकसानीपोटी आर्थिक मदतीचे धनादेश वितरीत करण्यात आले आहेत. यावेळी तहसीलदार किरण जमदाडे, जि.प. सदस्य नेताजी खंडागळे उपस्थित होते. दक्षिण सोलापूर तहसीलकार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात संबंधित बाधित शेतकऱ्यांना मदतीच्या रकमेचे चेक सुपूर्द करण्यात आले.

यामध्ये कासेगाव येथील प्रमोद पाटील यांना गायीसाठी ३७,५०० रुपये, धोत्रे येथील ब्रह्मानंद हिप्परगे यांना गायीसाठी ३७,५०० रुपये, बक्षीहिप्परगा येथील शिवाजी निकम यांना बैलासाठी ३२,००० रुपये, तर कुंभारी येथील अप्पाशा इमडे यांच्या सहा म्हशींपैकी तीन म्हशींच्या नुकसानीपोटी १,१२,५०० रुपये इतकी मदत देण्यात आली.

या आर्थिक मदतीसाठी दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांनी प्रयत्न केले. संकटाच्या काळात प्रशासनाने तातडीने दाखवलेली ही संवेदनशीलता आणि मिळालेला आधार यामुळे बाधित शेतकऱ्यांनी मनापासून समाधान व्यक्त केले असून तहसीलदार जमदाडे यांचे आभार मानले.

# बॉक्सिंग स्पर्धेत सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालयाचे यश



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते येथील विद्यार्थ्यांनी आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या अंतर्गत १ ऑक्टोबर २०२६ रोजी छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज, सोलापूर येथे आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धा २०२६-२७ पार पडल्या. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंनी यश संपादन केले.

या स्पर्धेत साईराज प्रदीप ननवरे याने ८० किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला, तर स्वप्निल पलंगे याने ५० किलो वजन गटात तृतीय क्रमांक मिळवला. दोन्ही खेळाडूंनी आपल्या कौशल्याच्या जोरावर ही यशस्वी कामगिरी केली.या यशाबद्दल महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सतेश पाटील यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. ते म्हणाले, 'बॉक्सिंगसारख्या खेळामध्ये शारीरिक क्षमता, तंत्रशुद्ध सराव, एकाग्रता, आत्मविश्वास आणि जिद्द या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. खेळाडूंनी नियमित सरावासोबतच शिस्त आणि मेहनतीला प्राधान्य दिल्यास निश्चितच मोठे यश मिळवता येते. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही आपले कौशल्य सिद्ध करावे. महाविद्यालयाकडून खेळाडूंना प्रोत्साहन आणि मार्गदर्शन देण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न असतो. साईराज ननवरे आणि स्वप्निल पलंगे यांनी मिळवलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. भविष्यातही त्यांनी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करावे, ही अपेक्षा शारीरिक शिक्षण संचालक प्रा. सतेश पाटील यांनी व्यक्त केली.या यशाबद्दल संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा तथा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिल सदस्या पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील, संस्थेचे मार्गदर्शक संचालक तथा महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. धवलसिंह प्रतापसिंह मोहिते-पाटील, संस्थेच्या मार्गदर्शक संचालिका सौ. उर्वशीराजे धवलसिंह मोहिते-पाटील आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवानराव साळुंखे, महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने नऊ महिलांचा 'नारीशक्ती' पुरस्काराने गौरव



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सामाजिक कार्यातूनच खऱ्या कर्तृत्वाची ओळख निर्माण होते. स्त्री-पुरुष समानता जपत समाजाप्रती असलेली जबाबदारी पार पाडणे हे प्रत्येकाचे नैतिक कर्तव्य आहे, असे प्रतिपादन श्रद्धा इन्स्टिट्यूटच्या संस्थापिका स्वाती शहा यांनी केले.

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नऊ महिलांना 'नारीशक्ती' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शनिवारी (दि. १०) रूपाभवानी चौकाजवळील हुतात्मा श्रीकिसन सारडा स्मारक सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून स्वाती शहा बोलत होत्या. यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार, समर्थ होमिओपॅथिक क्लिनिकच्या डॉ. गौरी बाचल, इनरव्हील क्लब सोलापूर हार्मनीच्या अध्यक्षा नेहा राठी आणि प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट आदी उपस्थित होते.

नवरात्राच्या पवित्र मुहूर्तावर नऊ महिलांचा सन्मान करण्याचा उपक्रम कौतुकास्पद आहे. दुर्गा, लक्ष्मी आणि सरस्वती या देवींच्या विविध रूपांचे प्रतीक असलेल्या महिलांचा गौरव करणे ही आनंदाची बाब आहे. पुरस्कारप्राप्त महिलांनी आपापल्या क्षेत्रांत कार्य करतानाच सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवावी. समाजासाठी केलेले कार्य हेच खरे योगदान ठरते. गृहिणी असूनही सामाजिक कार्यात सहभागी होणे ही मोठी जबाबदारी आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष समानतेचा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवून सामाजिक आणि नैतिक जबाबदारी जपली पाहिजे, असे आवाहन शहा यांनी केले.

सूत्रसंचालन नर्मदा कनकी यांनी केले तर अक्षता कासट यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अभिजीत व्हानकळस, सुरेश लकडे, प्रणव पोतदार, दीपक करकी, संतोष धाकपडे, अजित चव्हाण, महेश भाईकट्टी, अभिषेक दुलंगे, श्रीनाथ श्रीगण, राजेश केकडे, मनुश्री कासट, ज्योती कासट, रुपा कुत्ताते, शिला तापडिया, अनिता रेळेकर आणि शुभांगी लचके आदींनी परिश्रम घेतले.

**या मान्यवरांचा झाला पुरस्काराने सन्मान**

मिनाक्षी रामपुरे (कला क्षेत्र), उद्योजिका स्नेहा मकरीये (उद्योग), अमर ज्योती प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्षा वंदना गाडे (सामाजिक), युनिक ब्लॉसम प्रीस्कूलच्या संचालिका गौरी जोग (व्यवस्थापन), डॉ.सिमा तापडिया (वैद्यकीय), एलआयसी ब्रँच मॅनेजर प्रिती विहिरे (विमा क्षेत्र), नर्स रुमाना शेख (आरोग्य), झेडपी शाळा शिक्षिका भुमिका क्षीरसागर (शिक्षण), मनपा बालवाडी शिक्षिका रामेश्वरी बेरुनगी (बाल संस्कार) आदी नऊ मान्यवर महिलांचा या पुरस्काराने सन्मान करण्यात आला. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# युवा महोत्सवात एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाची १२ पारितोषिकांसह दमदार कामगिरी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगावझसोलापूर येथील विद्यार्थ्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या २२ व्या युवा महोत्सवात विविध कला प्रकारांत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली. एकूण १२ पारितोषिके व ४६ गुणांसह चौथ्या क्रमांकावर बाजी मारली.

बार्शी श्री शिवाजी महाविद्यालयात हा युवा महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या महोत्सवात विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले.

या युवा महोत्सवात एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी इन्स्टॉलेशन, वक्तृत्व स्पर्धा, शास्त्रीय गायन, कथाकथन, वेस्टर्न ग्रुप सिंगिंग, स्किट, भजन, मिमिक्री, पोवाडा, लावणी, रॅली आणि वेस्टर्न सोलो रिदम अशा विविध कला प्रकारांत यश मिळविले. यामध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकासह विविध पारितोषिके पटकावत विद्यार्थ्यांनी आपली कलात्मक गुणवत्ता सिद्ध केली.

वक्तृत्व स्पर्धेत किरण सुरवसे, शास्त्रीय गायनात वरद कुलकर्णी, कथाकथनात आदित्य नागणे, वेस्टर्न ग्रुप सिंगिंगमध्ये सानिका भोसले व सहकारी, स्किटमध्ये किरण सुरवसे व सहकारी, भजनात वरद कुलकर्णी व सहकारी, मिमिक्रीमध्ये किरण सुरवसे, पोवाड्यात प्रांजल शिंदे व सहकारी, लावणीत सहाना लोणीकर व सहकारी, तर रॅलीमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली. वेस्टर्न सोलो रिदममध्ये सुधर्म कुलकर्णी यांनी यश मिळविले.

यशस्वी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ यशपाल खेडकर, प्रा. सुशांत नवले, कला शिक्षक सुदर्शन माने, दयानंद बनकर, रोहन पंढरपुरकर, चैतन्य झाडे, विनायक शिंदे, समाधान काटे यांच्यासह संबंधित प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातील उत्कृष्टतेची परंपरा अधोरेखित झाली आहे.

कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करुन विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच सांस्कृतिक, साहित्यिक आणि कलात्मक क्षेत्रातही आपली गुणवत्ता सिद्ध करावी, असे मत व्यक्त केले. या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे, संघप्रमुखांचे व मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.